# राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**तक्रार क्र. ३३०/२०१९/छ.संभाजीनगर**
**(द्वितीय अपील क्र.४०५५/२०१८मध्ये)**

श्री. शेख मोहम्मद खुर्रम अब्दुल रशिद साब, : तक्रारदार
रा.टाउन हॉल, लाल मस्जिद, छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
लिपीक, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,पाणचक्की छत्रपती संभाजीनगर

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी
ई.टे.ऑडीटर, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,पाणचक्की छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

## निर्णय

**(सुनावणी दि. २९.०२.२०२४)**

तक्रारदार यांनी दि.१५.०३.२०२१९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.त्यामध्ये "तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे. व्दितीय अपील सुनावणीमध्ये दिलेल्या आदेशाप्रमाणे अंमलबजावणी न केल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ अन्वये तक्रारी अर्ज दाखल करीत आहे."

सदर आदेशाची अंमलबजावणी केली नाही, अशी तक्रार करुन संबंधितावर कलम २० नुसार कार्यवाही करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

आयोगाने द्वितीय अपील क्र.४०५५/२०१८ मध्ये दि.०६.०९.२०१८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले होते.

"वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या जोडपत्र "अ" मध्ये नमूद प्रमाणे परिपूर्ण माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात अपिलार्थीस नोंदणीकृत टपालने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. "

सदर प्रकरणावर दि.०४.१२.२०२३,दि.१९.०१.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली होती,सदरील सुनावणी परिपूर्ण न झाल्यामुळे ती दिं.२९.०२.२०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आली. तक्रारदार हे सुनावणीसाठी अनुपस्थित आहेत, तर जन माहिती अधिकारी हे ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सुनावणीच्यावेळी श्री.अब्दुल रफिक, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा लिपीक, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ,पाणचक्की छत्रपती संभाजीनगर (सध्या जिल्हा वक्फ अधिकारी नाशिक येथे कार्यरत) यांनी कथन केले की, आयोगाच्या आदेशाप्रमाणे दि.१८.०३.२०१९ व दि.१३.०२.२०२४ रोजीच्या पत्राने अपिलार्थी यांना माहिती दिली तसा अहवाल तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केलेला आहे.

यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

द्वितीय अपिलातील आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याकारणाने सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग ★ खंडपीठ छत्रपती संभाजीनगर ★ सत्यमेव जयते

**( समीर सहाय )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

तक्रार क्र.३३०/२०१९/छत्रपती संभाजीनगर जावक क्र. 8524/२०२४ दिनांक : 20/5/2024